# 'साय-फाय करंडक २०१७'च्या फिनालेचे नागराज मंजुळेंच्या हस्ते उद्घाटन

**पुणे** : क्विक हील फाउंडेशनने सायबर सुरक्षा जागृती निर्माण करण्यासाठी पुणे-सायबर पोलिसांच्या सहकार्याने आज साय-फाय करंडक या पहिल्याच एकांकिका स्पर्धांच्या तीन दिवसीय अंतिम फेरीचे उद्घाटन केले. प्रख्यात चित्रपट निर्माते आणि पटकथालेखक नागराज मंजुळे यांनी या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. यावेळी क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य तंत्रज्ञान अधिकारी संजय काटकर, पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे विभाग (ईओडब्ल्यू), सायबर क्राईम पोलिस उपायुक्त सुधीर हिरेमठ, ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले आणि एक्सप्रेशन लॅबचे संचालक प्रदीप वैद्य उपस्थित होते.